# जिल्हाधिकारी, अमरावती यांचे कार्यालय, जिल्हा अमरावती

*****************************************************************

क्र.प्र.अ./भू.स/अ.का./कावि - ३६२/२०२० दिनांक :- २४/०७/२०२०

*****************************************************************

## "कलम - १९" चे घोषणापत्र

## (भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३)

भू.सं.प्र.क्र. १/४७/२०१८-१९ मौजा झिलांगपाटी, ता. धारणी, जि. अमरावती

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या अमरावती जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांनी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचाहक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश"उक्त अधिनियम" असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोटकलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन अधिसूचना क्र. ६०/२०, दि. २३/०१/२०२० अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढलेली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमीनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, **अमरावती** जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांनी, कलम १५ च्या पोट कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे ; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त **सार्वजनिक प्रयोजनासाठी** उक्त जमीनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूचीतीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्रहे बाधित कुटूंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी"**पुनर्वसाहत क्षेत्र**" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचासारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठीउपजिल्हाधिकारी (भूसंपादन) (अ.व.प्र.) लाभक्षेत्र क्र.२, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांना पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची - एक

संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

गांव झिलांगपाटी, तालुका धारणी, जिल्हा अमरावती

| अ. क्र. | सर्व्हे नंबर / गट नंबर | अंदाजित क्षेत्र (हेक्टर आर मध्ये) | अ. क्र. | सर्व्हे नंबर / गट नंबर | अंदाजित क्षेत्र (हेक्टर आर मध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ७१ | ०.८० | ११ | ७९/ड | ०.६० |
| २ | ७२ | १.४० | १२ | ७९/ब | ०.३० |
| ३ | ७३ | ०.३१ | १३ | १४९ | ०.५९ |
| ४ | ७३/अ | ०.४२ | १४ | १४६ | ०.४१ |
| ५ | ७३/ब | ०.२१ | १५ | १३३/क | ०.४० |
| ६ | ७३/क | ०.३६ | १६ | १२७ | ०.१७ |
| ७ | ७३/ड | ०.३१ | १७ | १२६ | ०.७० |
| ८ | ७३/ई | ०.२७ | १८ | १२४/अ | ०.४० |
| ९ | ७४ | ०.७१ | १९ | ११८/अ | ०.४९ |
| १० | ७५ | ०.४७ | २० | ११८/ब | ०.४९ |
| | | | २१ | १५० | ०.२० |
| एकूण क्षेत्र १०.०१ | | | | | |

## अनुसुची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

१) प्रकल्पाचे नांव :- गर्गा मध्यम प्रकल्पांअतर्गत बुडीत क्षेत्राच्या कामाकरीता

२) प्रकल्प कार्याचे वर्णन :- गर्गा मध्यम प्रकल्पांअतर्गत बुडीत क्षेत्राच्या कामाकरीता

३) सामाजिक मिळणारे लाभ :- गर्गा मध्यम प्रकल्पांअतर्गत बुडीत क्षेत्राच्या निर्मितीमुळे जवळपासच्या क्षेत्रात पाणी पातळीत वाढ होऊन सिंचनासाठी, पिण्यासाठी पाणी उपलब्ध होईल. तसेच मत्स्य व्यवसाय, पशुसंवर्धानामध्ये वाढ, कुटीर उद्योगास फायदा व रोजगार निर्मीती ईत्यादी ग्रामीण पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात भर पडून शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होणार आहे.

## अनुसूची - तीन

## पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

गांव झिलांगपाटी, तालुका धारणी, जिल्हा अमरावती

| अनुक्रमांक | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर | क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| विस्थापन होत नसल्याने पुनर्वसाहतीची आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक | | |

## अनुसुची चार

सदर प्रकरणी घरे/कुटूंबे बाधीत होत नाहीत. सबब विस्थापन होत नसल्याने पुनर्वसनाची व पुनर्वसाहतीची (पुनर्स्थापनेची) आवश्यकता नाही.

दिनांक :- २४/०५ २०२०

ठिकाण :- अमरावती.

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)
अ.व.प्र. लाभक्षेत्र क्र.२ अमरावती

(शैलेश नवाल)
जिल्हाधिकारी, अमरावती